# Loksatta

The Resource Centre

**Date: 24/03/2017** **Page No: 10** **Location: Main** **Circulation: 300000**

**Edition: Mumbai**


## Emami Group in partnership with Sheth Corp; invests Rs 350 crore

# ‘इमामी ग्रुप’ची ३५० कोटींची गुंतवणूक

### शेठ कॉर्पबरोबर मुलुंड प्रकल्पात भागीदारी

व्यापार प्रतिनिधी, मुंबई

**बांधकाम क्षेत्रातील** आघाडीच्या इमामी समूह आणि शेठ कॉर्प यांनी मॉटाना या मुलुंडमधील पहिल्या प्रकल्पाची घोषणा केली आहे.

पूर्व भारतात नावाजलेल्या इमामीचे बांधकाम क्षेत्रातील अंग असलेल्या ‘इमामी इन्फ्रास्ट्रक्चर’ तसेच आलिशान आणि मध्यम घरनिर्मितीतील शेठ कॉर्पबरोबर या गृह प्रकल्पासाठी प्रत्येकी ५० टक्के भागीदारी असेल.

प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय वास्तुविशारद जेम्स लॉ यांनी या प्रकल्पासाठी रचनात्मक कौशल्य सादर केले आहे तर अंतर्गत आरेखनात जागतिक स्तरावर नावाजलेल्या एचबीए, सिंगापूरद्वारा सहकार्य लाभले आहे. तर बँकॉकमधील ट्रोप लँडस्केप डिझायनर प्रकल्पाला सौंदर्य प्राप्त करून देणार आहेत.

मुंबई उपनगरातील सात एकरीवरील शेठ आणि इमामीचा मॉटाना प्रकल्प एलबीएस मार्गावर (पश्चिम) वसला आहे. यातील चार गृह मनोऱ्यांमध्ये विविध आकारातील २, ३, ४ आणि ५ बीएचके रचना असलेली घरे असतील.




**मॉंटाना प्रकल्पाच्या घोषणेप्रसंगी अश्विन शेठ व आर. एस. अग्रवाल.**

इमामी व शेठ समूहाच्या वतीने आयोजित एका पत्रकार परिषदेत या प्रकल्पाबाबतची माहिती देण्यात आली. यावेळी शेठ ग्रुपचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक अश्विन शेठ म्हणाले की, वसंत ऑस्कर आणि वसंत गार्डन प्रकल्पांद्वारे आधीपासूनच आमची मुलुंडमध्ये उपस्थिती आहे. नव्या प्रकल्पाच्या निमित्ताने होणारी इमामी समूह, जेम्स लॉ, एचबीए सिंगापूर आणि ट्रोप यांच्या बरोबरची भागीदारी दीर्घकालीन असेल.

इमामी समूहाचे संयुक्त अध्यक्ष आर. एस. अग्रवाल यांनी यावेळी सांगितले की, मॉटाना हा शेठ कॉर्पबरोबरचा आमचा तिसरा प्रकल्प आहे. या प्रकल्पाची बोलणी सर्वप्रथम २०१५ मध्ये झाली होती. मॉटाना हा आमचा मुलुंडमधील पहिला प्रकल्प आहे.


Copyright of the article is with the publication